# अवयवदान करा

## जीवनाच्या पलीकडे जगा...

DonoReLIFE

Donate Organs, Live Beyond Life

# अवयव दान

## करण्याबाबत शैक्षणिक पुस्तिका

Awareness initiative by:

**CONCORD BIOTECH**

## अवयव दान काय आहे?



जिवंत वा मृत व्यक्तीच्या शरीरातुन शल्यक्रियेद्वारे अंग वा अवयव काढुन दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरात रोपण करण्यास अवयव दान म्हणतात.[1]




## अवयवांचे रोपण का केले जाते?

अवयवांच्या रोपणांनी पुष्कळशा लोकांना जीवदान मिळते आणि ह्यासारखे प्रभावी पर्याय उपलब्ध नसल्यास ह्याद्वारे शरीराची आवश्यक कार्यप्रणाली पुन्हा बहाल केली जाते.[2]

### अवयव दानाचे प्रकार:

**जिवंत अवयव दान:** ह्या प्रकारात निरोगी जिवंत व्यक्तीचे अवयव काढले जाऊन तोच अवयव निकामी झालेल्या रुग्णाच्या शरीरात रोपण केले जातात.[3]

ह्या प्रकारातील सर्वसामान्य उदाहरणे आहेत यकृत आणि मूत्रपिंड कारण दात्याच्या यकृताची वाढ परत त्याच्या सर्वसामान्य आकारापर्यंत होऊ शकते आणि १ मूत्रपिंड दान केल्यानेही दाता उरलेल्या १ मूत्रपिंडावर आयुष्य चालवु शकतो.[3]

**मृत अवयवांचे दान:** ह्या अवयव दान प्रकारात चिकित्सकांनी मेंदू मृत (ब्रेन डेड) घोषित केलेल्या व्यक्तीचे अवयव काढले जातात.[3]

एकाद्या व्यक्तीस मेंदू मृत तेव्हा घोषित केले जाते जेव्हा:

- शुद्ध हरपून परत येण्याची शक्यता नसते
- मेंदूतील चलनवलन बंद असते
- स्वचालित श्वसन प्रक्रिया पूर्ण पणे बंद असुन परत सुरु होण्याची शक्यता नसते

सर्व व्यवहार्य अवयव आणि मांसल भागांचे दान मृत्यूनंतर केले जाते. [3]

## कोणते अवयव दान केले जाऊ शकतात?



## कोणते मांसल भाग दान केले जाऊ शकतात?[3,4]




## असे कोणते अंतिम टप्प्यावरील रोग आहेत ज्यांना अवयव रोपणाने बरे केले जाऊ शकते?[5]



## अवयव दाता कोण बनु शकतो?[1]

- सर्व वयाच्या लोकांना संभवित दाता मानले जाते.
- जेव्हा व्यक्ती मृत पावते, तेव्हा त्यांच्या वैद्यकीय इतिहास आणि वयाप्रमाणे दान अनुकूलता पारखली जाते.

## अवयव दाता कोण बनु शकत नाही?[3]

- ज्या लोकांना कर्करोग आहे/होता
- एचआयव्ही असणारे रुग्ण
- अशा रोगांचे रुग्ण ज्यांच्या रक्ताभिसरणात किंवा मांसल भागात रोगामुळे जंतु असतात.

## मृत दात्याच्या शरीरातुन अवयव बाहेर काढल्यानंतर तो किती वेळ जिवंत/वापरण्याच्या अवस्थेत असतो?[4]

**हृदय आणि फुफ्फुसे**
४-६ तास

**यकृत**
६-१२ तास

**मूत्रपिंड**
३० तासांपर्यंत

**आतडी**
६ तास

**स्वादुपिंड**
६ तास

## भारतातील परिस्थिती[6]

सुमारे ५ लाख लोकांना दररोज अवयव प्रत्यारोपणाची गरज भासते

१७ लोक अवयव प्रत्यारोपणाची वाट पाहताना मृत्यू पावतात

अवयव प्रत्यारोपणाच्या मागणीतील फक्त २-३%च पूर्ण होते

- भारतात १.५ लाख लोकांचा मृत्यू मेंदू मृत झाल्याने होतो
- तरीही अवयव दान दर फक्त ०.८६ प्रति १० लाख लोकसंख्येइतकाच आहे

फक्त ९०५ मृत दाता भारतात २०१७ मध्ये उपलब्ध होते

## भारतातील अवयव दानाची आवश्यकता[6]



२००००० मूत्रपिंड ▶ १६८४ मूत्रपिंड

५०००० हृदये ▶ ३३९ हृदये





५०००० यकृते ▶ ७०८ यकृते

भारतात सर्वात कमी प्रमाणात मृत दात्यातील अवयव दान होते[7]




२०१९ मध्ये एकुण अवयव प्रत्यारोपण संख्या - १२,६६६[7]

## अवयव दाता का बनावे?[8]



१ दात्यामुळे वाचतील

८ अवयव दानामुळे

> ७५ मांसल भाग दानामुळे

## अवयव दानाबद्दल ८ दंतकथा आणि तथ्ये[9]

| दंतकथा | तथ्ये |
|---|---|
| जर कुटुंबाने दानास संमती दिली तर चिकित्सक रुग्णाचे प्राण वाचविण्याची धडपड करणार नाहीत. | जेव्हा आपण उपचारांसाठी इस्पितळात जाता तेव्हा चिकित्सक आपला जीव वाचविण्याची कसोशी करतात, दुसर्यांचा नव्हे. |
| जर मी मृत मेंदूतुनही बरा झालो तर? | मृत मेंदूतुन बरे होणे अशक्य आहे - हे कोमासारखे नसते.<br>ज्या लोकांनी अवयव दानास संमती दिली असेल, ते खरोखरीच मृत मेंदू आहेत का ह्याची तपासणी करण्यासाठी त्यांच्या अतिरिक्त चाचण्या (कुटुंबास खर्चाची तोशीस न देता) करविल्या जातात. |
| जर मी अवयव दान केले तर माझ्या पुढच्या जन्मात माझा तो अवयव मला नसेल. | जेव्हा आपले शव अग्नीस समर्पित केले जाते तेव्हा आपले अवयवही नष्ट होतात. शरीर हे मृत्यूनंतर राहू शकत नाही म्हणुन जरी आपण पुनर्जन्मावर विश्र्वास ठेवत असाल तरी ह्या जन्मातील शरीराचा आपल्या पुनर्जन्मात काहीही उपयोग नसतो. |
| धर्माने अवयव दानास आणि प्रत्यरोपणांस बंदी केली आहे | सर्व प्रमुख धर्म, अवयव प्रत्यारोपणास एक मानवतावादी कार्य मानतात. प्रमुख धर्म नेत्यांनीही ह्यास दुजोरा दिला आहे. |

| दंतकथा | तथ्ये |
| --- | --- |
| अवयव दानाने शरीर विच्छिन्न होते | दान केलेले अवयव हे शल्यक्रियेद्वारे योग्यरीत्या काढले जातात, ज्यामुळे शरीर विच्छिन्न होत नाही.<br>तसेच, दात्याच्या शरीरावर अग्नीसंस्कारापूर्वी कापड घातलेले असल्याने दानाची दृष्य लक्षणेही दिसत नाहीत. |
| जर आपण गर्भश्रीमंत वा ख्यातनाम व्यक्ती असला तर आपण अवयवांसाठी थांबलेल्यांच्या यादीत वरच्या श्रेणीत जाता. | आजाराची गंभीरता, अवयव दानासाठी थांबावा लागलेला काळ, रक्त प्रकार आणि जुळणी संभवता ह्या घटकांप्रमाणे, अवयवदानासाठी थांबणार्यांच्या यादीत आपले स्थान नक्की केले जाते. रुग्णांची आय, वंश किंवा सामाजिक स्थान ह्याचा विचार अवयव वाटप प्रक्रियेत कधीच केला जात नाही. |
| जर मी माझे अवयव दान केले तर माझ्या अंत्यसंस्कारास उशीर होईल | अशीही शक्यता असु शकते. तरीही दानाचे परोपकारी स्वरुप पाहता, बहुतेक वेळा कुटुंब ह्यास मान्यता देते आणि दान प्रक्रियेचा हिस्सा मानते. |
| जर एकदा का मी अवयव दाता बनलो कि मग मी माघार घेऊ शकत नाही | आपण केव्हाही मन बदलु शकता. आपले पंजीकरण (रजिस्ट्रेशन) आपण केव्हाही मागे घेऊ शकता आणि आपल्या कुटुंबाला आपण असे केल्याचे नक्की सांगा. |

## अवयव दानाबाबत आपल्या चिकित्सकांना आपण प्रश्न विचारु शकता[10]

१. प्रत्यारोपणातील जोखमी आणि फायदे काय आहेत?

२. इतर इस्पितळांच्या वा शल्यक्रियातज्ञांच्या तुलनेत येथे दर वर्षी किती प्रत्यारोपणे केली जातात?

३. ह्या इस्पितळातील माझ्या प्रकारचे प्रत्यारोपण यशस्वी होऊन रुग्ण बचावण्याचा दर काय आहे?

४. एखाद्या रुग्णासाठी एक विशिष्ट अवयव स्वीकारावा कि नाही ह्याचा निर्णय वैद्यकीय गट कसे घेतात?

५. प्रत्यारोपण गटात कोण-कोण सामिल असतात आणि त्यांच्या भूमिका काय असतात?

६. प्रत्यारोपण प्रक्रियेबाबत मला कोण समजावेल?

७. अवयव दान केल्यानंतर माझ्या शरीरात काय बदल जाणवतील?

## भारतात अवयव दानांसाठी नियामक मंडळ कोणते आहे?

नोटो (NOTTO): राष्ट्रीय अवयव आणि अंग प्रत्यारोपण संस्था (नॅशनल ऑर्गन अँड टिश्यू ट्रांसप्लांट ऑर्गनायझेशन

## भारतात अवयव दात्याचे पंजीकरण कसे करावे?[11]

नोटो च्या अधिकृत वेबसाईटवरील एक ऑनलाईन फॉर्म भरुन आपण स्वत:चे पंजीकरण अवयव दाता म्हणुन करवु शकता.

नंतर आपल्याला आपल्या विशिष्ट सरकारी पंजीकरण क्रमांकासह एक दाता कार्ड मिळेल जे आपण सर्वकाळ आपल्या सोबत बाळगावे आणि आपल्या कुटुंबास तसेच आपल्या मित्रानांही आपल्या ह्या निवडीची माहिती द्यावी.

## Reference:


*1. Cleaveland clinic. Organ donation and transplantation. 2021. Available at: https://my.clevelandclinic.org/health/articles/11750-organ-donation-and-transplantation Accessed on: 30 June 2022.*

*2. World Health Organization. Transplantation. 2022. Available at: https://www.who.int/health-topics/transplantation#tab=tab_1 Accessed on: 30 June 2022.*

*3. The Organ Receiving & Giving Awareness network (ORGAN) India. What is Organ donation? Available at: https://www.organindia.org/overviews/know-organ-donation/ Accessed on: 30 June 2022.*

*4. National health portal. India. Organ donation day. Available at: https://www.nhp.gov.in/Organ-Donation-Day_pg Accessed on: 30 June 2022.*

*5. National organ and tissue transplant organization. Available at: https://notto.gov.in/faqs.htm Accessed on 30 June 2022.*

*6. The Organ Receiving & Giving Awareness network (ORGAN) India. Make a pledge. Available at: https://www.organindia.org/make-a-pledge/ Accessed on: 30 June 2022.*

*7. The Organ Receiving & Giving Awareness network (ORGAN) India. Available at: https://www.organindia.org/deceased-organ-donation-data/ Accessed on: 30 June 2022.*

*8. American Transplant Foundation. Facts and myths about organ donation. Available at: https://www.americantransplantfoundation.org/about-transplant/facts-and-myths/ Accessed on 30 June 2022.*

*9. The Organ Receiving & Giving Awareness network (ORGAN) India. Organ donation myths and facts. Available at: https://www.organindia.org/myths-and-facts/ Accessed on: 30 June 2022.*

*10. Crozer health. Important questions to ask. Available at: https://www.crozerhealth.org/services/transplant/important-questions-to-ask/ Accessed on: 30 June 2022.*

*11. The Organ Receiving & Giving Awareness network (ORGAN) India. Pledge to be an organ donor. Available at: https://www.organindia.org/pledge-to-be-an-organ-donor/ Accessed on 30 June 2022.*

PROUD TO BE AN ORGAN DONOR!

Scan the QR Code
to know more about

**ORGAN DONATION**

Awareness initiative by:
**CONCORD BIOTECH**

**Disclaimer:** Conceptualized, Edited & Designed by Aurum Medcom with an unconditional educational grant from Concord Biotech Ltd. Concord Biotech Ltd is not responsible for the nature of content or any associated copyright or intellectual property issue. The views expressed do not necessarily reflect those of the publisher or sponsor. Please consult your treating physician before following any information from this booklet.

For the use of a Registered Medical Practitioner or Hospital or Laboratory only.

Designed and developed by: aurum medcom

Marathi